
THANE POLICE
COMMISSIONERATE

प्रेस नोट दिनांक :– ०३/०३/२०२१

## पॉलिश करण्यसाठी दिलेले दागीन्यांचा अपहार करणा–या आरोपीतास अटक

दिनांक २५/०२/२०२१ रोजी ज्वेलर्स अमोद दिलीप चाचड यांनी त्यांचे एकुण ७६२ ग्रॅम वजनाचे किंमत रू. ३२,८०,०००/– किंमतीचे सोन्याचे दागीने पॉलिश करण्यासाठी कारागीर राजा शेख याचेकडे विश्वासाने दिले होते. राजा शेख याने सदर दागीन्यांना पॉलिश न करता सदर दागीन्यांचा अपहार करून पसार झाला. सदरबाबत दिनांक २५/०२/२०२१ रोजी नौपाडा पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. ५१/२०२१, भादविसं कलम ४०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नमुद गुन्हयाचे तपासात मिळालेल्या बातमीनुसार व तांत्रिक तपासाचे आधारे दिनांक ०५/०३/२०२१ रोजी आरोपीत नामे रफिकुल नुरूल इस्लाम शेख वय ४८ वर्षे यास त्याचे रहाते घर गितांजली बिल्डींग, बिल्डींग नं. ए–१, रूम नं. २३, जास्मीन मिल रोड, रहेमत रेस्टॉरंटचे समोर, धारावी, मुंबई. येथून ताब्यात घेवून अटक करण्यात आले आहे. नमुद आरोपीतांकडून गुन्हयातील अपहार केलेल्या सोन्याचे धातुचे दागीने हस्तगत करण्यात आले आहेत. सदर गुन्हयातील पाहिजे आरोपी राजा शेख याचा शोध चालू आहे.

अटक आरोपीतांकडून जप्त मुद्देमाल खालील प्रमाणे

१) २७,५५,०१०–०० रू. किं. चे ६४४.४ ग्रॅम वजनाचे सोन्याच्या धातुचे दागीने.

सदर गुन्हयांची उकल ही मा. पोलीस आयुक्त श्री विवेक फणसळकर सो, सह पोलीस आयुक्त सुरेश कुमार मेकला सो, मा.अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग श्री अनिल कुंभारे व मा. पोलीस उप आयुक्त, श्री अविनाश अंबुरे यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, श्रीमती निता पाडवी यांनी दिलेल्या मागदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नौपाडा पोलीस ठाणे श्री अनिल मांगले व पोलीस निरीक्षक, गुन्हे रविंद्र क्षिरसागर यांनी पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकास वेळोवेळी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाखाली नौपाडा पोलीस ठाणेचे गुन्हेप्रकटीकरण कक्षाचे सपोनि/निलेश मोरे, पोउपनि विनोद लभडे, पोना/१२१९ साहेबराव पाटील, पोना/२२२७ सुनिल राठोड, पोना/४४१ संजय चव्हाण, पोना/६५९७ विकास चडचणकर, पोशि/३७०५ गोरखनाथ राठोड यांनी व पोशि/७२६१ एस.व्ही. माळी, नेम. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ यांनी वेळोवेळी पुरविलेल्या तांत्रिक माहीतीचे आधारे मा. वरिष्ठांचे मागदर्शनाखाली केलेली आहे.